प्रकरण १ ले

प्रस्तावना

प्रकरण १ ले

प्रस्तावना

१९ व्या शतकातील स्त्री हक्कांचा विचार करता असे लक्षात येते की, १९ व्या शतकात स्त्रियांना कोणते हक्क, अधिकार नव्हते. १९ व्या शतकात पूर्वापार चालत आलेल्या परंपरा यांचा समाजावर पगडा होता. धर्मशास्त्रानुसार चालत आलेल्या रूढींनी, प्रथांनी समाज नियंत्रित केला जात असे. त्यातच भर म्हणून इंग्रज सरकारचा अंमलही वाढलेला होता. अशाप्रकारे १९ व्या शतकात समाजात अस्थिरता होती. सामाजिक, धार्मिक, आर्थिक विषमता मोठ्याप्रमाणात होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या वर्णव्यवस्थेवर आधारित समाजव्यवस्था होती. अशाप्रकारची व्यवस्था असताना स्त्रिला समाजात दुय्यम स्थान होते. तिला दासी मानले जात. तिच्यावर अनेक बंधने लादली जात होती.

१९ व्या शतकात जनजीवन अस्थिर होते. एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या स्त्रियांची मानली तर समाजात पुरूषांबरोबरीने स्थान द्यायला हवे होते. पण पुरूषसत्ताक कुटुंबपद्धती स्वीकारलेल्या समाजाने स्त्रिला पुरूषाबरोबरीचे समान हक्क, अधिकार, समान न्याय, स्थान, नाकारलेलेच होते. त्याकाळी समाजात पुरूषसत्ताक पद्धती होती. पुरूषांना राजकारण, कुटुंब, आर्थिक, सामाजिक या स्तरांवर स्त्रियांपेक्षाही महत्त्वाचे स्थान होते. स्त्रियांना दुय्यम स्थान किंबहुना त्याहीखालचे दासीचे स्थान होते. त्यांना राजकारण, समाजकारण, आर्थिकता, कुटूंब याविषयी सत्ता नव्हती. अशाप्रकारे तिला समाजात गौण स्थान होते. त्यातून अनेक अत्याचार, अन्याय, जुलूम तिच्या वाट्याला येत होते. धार्मिक प्रथा, परंपरेच्या नावाखाली तिचे विद्रुपीकरण केले जात होते. तिचे केस कापले जात होते. तिला जाळले जात, डांबले जात, अन्नपाण्याशिवाय तिला ठेवले जात होते. तिच्यावर अतोनात अत्याचार केले जात. विकृत लैंगिक वासनेसही ती

बळी पडत होती. या सर्वाला स्त्री कंटाळून गेली होती. तिला तिचे जीवन नकोसे झाले होते.

असे असले तरी १९ वे शतक मात्र स्त्रिच्या भाग्याचे ठरले. कारण याच शतकात स्त्रिच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रथम प्रयत्न सुरू झाला. १९ वे शतक भारतीय समाजजीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरले. स्त्रिवर अन्याय होतो आहे, याविषयी जाण प्रथमत: शिक्षितांना आली होती. हे स्त्री जीवनाविषयक प्रश्नांचे वैशिष्ट्य म्हणता येईल. 'ब्रिटीश राजवटीत पुरूषांच्या विचारात,ध्येयात मूलगामी फरक पडू लागला होता. त्यांच्या ठायी ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या सहवासाच्या अनुषंगाने नवे कर्तृत्व निर्माण होत होते. नवी दृष्टी निर्माण होत होती. ह्या नव्या दृष्टीला प्रथम जर कोणती गोष्ट दिसली असेल तर ती म्हणजे स्त्रियांची अवहेलनात्मक स्थिती.' [संत (२००३) १९] त्यांना स्त्रीवरील बंधनाची जाणीव झाली. शिक्षणाच्या निमित्ताने ते परदेशी जाऊ लागले. परदेशातील स्वतंत्र स्त्री व भारतातील स्त्रियांची स्थिती यामधील तफावत सुधारकांना दिसून आली. तिथे स्त्रिला मिळालेली समानतेची वागणूक, मत मांडण्याचा अधिकार घराबाहेर पडलेली स्त्री दिसली. त्यावेळी धर्मबंधनात सापडलेली भारतीय स्त्रिची जाणीव होऊन त्यांची विवेकनिष्ठा जागृत झाली.

सुधारकांनी स्त्रिला बंधनमुक्त करण्याचा विचार केला व स्वत:च्या घरातील स्त्रियांपासून सुधारणा सुरू केली. त्यांनी आपल्या स्त्रिला शिक्षित केले. सुधारकांनी भारतातील बालविवाह, सती, विधवा पुनर्विवाह बंदी, जरठबालाविवाह अशा प्रथांविरोधी वाचा फोडण्याचा प्रयत्न सुरू केला. मानवहितवादी विचारसरणीतून व सामाजिक गरजेतून सुधारणा घडवून आणण्यास सुरूवात केली. त्यामध्ये महात्मा फुले, आगरकर, बाळशास्त्री जांभेकर, बाबा पदम्नजी, न्या. रानडे, कर्वे यासारख्या सुधारकांचा समावेश होता. बालविवाह, जरठबाल विवाह, पुनर्विवाह, सती, बहुपत्नीत्व सारख्या प्रश्नांविरोधी त्यांनी

आवाज उठविला व त्यादिशेने प्रयत्न सुरू केले. त्यांनी प्रामुख्याने पुढील प्रश्नांना हात घातला.

१९ व्या शतकातील स्त्री प्रश्न

१९ व्या शतकात धर्मशास्त्रानुसार चालत आलेल्या रूढींनी, प्रथांनी समाज नियंत्रित केला जात असे. समाजात पुरूषसत्ताक कुटुंबपद्धती पूर्वापार चालत आलेली आहे. या पद्धतीत समाजाने स्त्रिला पुरूषाबरोबरीचे समान हक्क, अधिकार, समान न्याय व समान स्थान नाकारलेलेच होते. स्त्री प्रश्नांमध्ये बालविवाह, विधवाविवाह, केशवपन, जरठबाला विवाह, सती जाणे, भ्रुणहत्यासारख्या प्रश्नांचा विचार करता येईल. हे निर्बंध लादल्यामुळे स्त्रिला जगणे कठिण बनले होते. यामुळे स्त्रिला स्वअस्तित्वाची जाणीव होणे दूरच होते. तिला स्वत:च्या माणूसपणाची जाणीवच नव्हती. म्हणूनच ती हसतमुखाने जाच सोसत होती. तिला तिच्यावर लादलेल्या दु:खी जीवनाची, सत्ताहिनतेची जाणीवच नव्हती. तिच्यावर लादलेले निर्बंध कर्तव्य म्हणून ती पालन करत होती. तरीही १९ वे शतक हे स्त्री उद्धाराचे, स्त्री प्रश्नासंबंधी जागृती निर्माण होण्याचे शतक होते. या काळात स्त्रियांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याची सुरूवात प्रथमत: बंगालमध्ये झाली. नंतर महाराष्ट्रात सुरू झाली. स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यावेळच्या अनेक समाज सुधारकांनी कार्य केले. स्त्रिच्या विकासामध्ये फार मोठा वाटा प्रथम पुरूषांनीच उचलला.

बालविवाह

स्त्रियांना बालविवाहसारख्या घोर प्रश्नाला सामोरे जावे लागत होते. लग्न म्हणजे काय? हे न जाणत्या वयात संसारी जबाबदारीस त्या बळी पडत. बालविवाहामुळे बालविधवांची संख्याही मोठ्या प्रमाणात होती. लहानवयातच विधवांना सती जावे लागे. त्यामुळे समाजसुधारकांच्या मताप्रमाणे बालविवाह ही प्रथा सर्व स्त्रिप्रश्नांचे मुळ कारण होती.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

बालविवाह बंद होण्यासाठी सुधारकांनी संमतीवयाचे बिलास पाठिंबा दिला. बेहरामजी मलबारींनीही यास पाठिंबा दिला व (१८८१) संमतीवयाचे बिल पास झाले. १५ ऑगस्ट १८८४ रोजी श्री. बेहरामजी मलबारी यांनी गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांच्याकडे २ टिपणे पाठविली. त्यातील पहिल्या टिपनात 'हिंदुस्थानातील बालविवाह' यामध्ये ' भ्रुणहत्येपेक्षाही बालविवाहाची रूढी किती अनिष्ट व दुष्ट प्रथा आहे हे विस्ताराने मांडले.' [भागवत (२००४) ३१] समाजातील दु:खाचे कारण लादलेले वैधव्य आहे त्यास बालविवाहाची पद्धत कारणीभूत आहे. असे मलबारींचे मत होते. 'मुलामुलींची लग्ने त्यांच्या आईवडीलांनीच ठरवूर, लावून देण्याची चाल असल्यामुळे लहान वयातील वधुवरांचे एकमेकांशी चांगले जमते देखील, तरीही या चालीमुळे लहानवयातच संसाराच्या जबाबदारीच्या ओझ्याखाली तरूण वयातच नवरे पिचून जातात, त्यांचे शिक्षण थांबून जाते, मुली लहान वयातच संसाराला लागल्यामुळे, त्यांची प्रकृती निस्तेज होते. ' असे बालविवाहाचे दुष्परिणाम श्री. मलबारी यांनी आपल्या टिपण्यांमध्ये मांडले. [रानडे (२००५) ११४] बालविवाहामुळे राष्ट्रीय नुकसान होत असल्याची जाणीव सुधारकांना झाली होती. ''बालविवाहाची समस्या ही खरी आर्थिक व बेसुमार लोकसंख्यावाढीची समस्या आहे. म्हणून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तरी सरकार त्याबाबतीत काही करणार आहे की नाही?'' असा मलबारी यांनी आपल्या टिपण्यांमधून सरकारला जाब विचारला. [रानडे (२००५) ११५] त्याचबरोबर बालविवाह बंदीसाठी सरकारने कायदे करावेत अशी त्यांनी मागणी केली, त्यांच्या या मागणीस आगरकरांनीही पाठिंबा दिला.

आगरकरांनी संमतीवयाच्या बिलास पाठिंबा दिला व यास विरोध करणाऱ्या धर्माभिमान्यांच्यावर त्यांनी टिका केली. ''आम्ही आपल्या मुली व मुलांचे गळे धर्माच्या नावाने कापण्याचा आग्रह करतो.'' असे आगरकर सती व बालविवाह विरोधी टिका करताना म्हणतात. बालविवाह बंदीमुळे मुलींवरील विधवा होण्याचे संकट टळेल. 'बालविवाहाची चाल ही स्त्रिच्या दुर्दशेचे एक प्रमुख कारण आहे असे आगरकर मानतात व

बाल विवाहाला विरोध करताना ते स्वयंवराचा पर्याय देतात.' [प्रधान (१९६०) ८४] अशाप्रकारे समाजसुधारकांनी बालविवाह प्रथेस विरोध केला. बालविवाहामुळे बालविधवांची संख्या वाढत आहे असे त्यांचे ठाम मत होते.

वैधव्यास्थिती : सती व केशवपन

१९ व्या शतकातील विधवांची तर व्यथाच दु:खकारक होती. 'पती मेला की तिचा संसार संपला, तिला जगण्याचे कारणच राहिले नाही; तिने पतीच्या प्रेताबरोबर सती जावे हाच सर्वोत्तम मार्ग मानला जात होता.' [सहस्त्रबुद्धे (१९७४) १३४] असा त्यावेळच्या समाजात समज होता. पतीनिधनानंतर सती जाणे विधवेला बंधनकारक होते. स्त्रिच्या दास्यत्वाचा कळस म्हणजे विधवा स्त्रीचे केशवपन होय. नवरा मरताच बालविधवेचेही केशवपन केले जात असे. केशवपन म्हणजे हिंदू स्त्रीवर होणाऱ्या घोर अन्यायाचे व जुलुमाचे मूर्तरूपच होय. विधवा पुनर्विवाह घडवून न आणता तिचे विद्रुपीकरण करून तिला माणसातूनच उठविण्याची व्यवस्था समाजाने केली होती. विधवेचे आईबापही तिच्या मरणाची वाट पहात. अशाप्रकारे विधवेचे जीवन पतीच्या चितेवर किंवा अंधारकोठडीत व्यथित होत असे.

विधवेची चर्चा वृत्तपत्रांतून घडून येत होती. 'मराठीत बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' मधून व लोकहितवादींनी शतपत्रातून विधवाविवाह ह्या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेतले होतेच ' [कर्वे (२००३)३४] '१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात विधवा पुनर्विवाहाची चळवळ महाराष्ट्रात रूजवण्याचे श्रेय 'दर्पण' या पत्राला जाते.' [व्होरा (२०००) १२२] म. फुलेंनीही विधवेच्या स्थितीविषयी 'दिनबंधू' वृत्तपत्रातून वाचा फोडण्याचे कार्य केले. त्यांनी केशवपनास विरोध म्हणून नाभिकांचा संप घडवून आणला. फुल्यांनी 'विधवा पुनर्विवाह परिषदे'ची पंढरपुरमध्ये अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली. फुल्यांनी इ.स. १८६३ मध्ये बहिष्कृत महिलांसाठी पुण्यात आश्रमाची स्थापना केली. महिलांना अर्थार्जनाची संधीही दिली. पुढे 'फुले दांपत्यांने विधवा विवाहाला पाठिंबा देवून, बालहत्त्या

प्रतिबंधकगृहाची स्थापना केली.' [पाटील (२००७) २१] त्यामुळे भ्रुणहत्येसारख्या पापापासून अनेक स्त्रियांची सुटका फुलेंनी केली.

'१९४८ च्या सुमारस लिहिलेल्या बाबा पद्मनजींच्या 'यमुना पर्यटन' ह्या मराठीतल्या पहिल्या कादंबरीचा विषयही विधवा दु:खवर्णन हाच आहे.' [भागवत (२००४) ४०] मलबारींनीही विधवा प्रश्न मांडलेला आहे. त्यांनी वैधव्यदशेच्या दुर्दशेस ब्रिटीश शासनास कारणीभूत मानले आहे. कारण ब्रिटीश शासनाने सतीप्रथेला प्रतिबंध केला. परंतु वैधव्य स्थितीतील दु:खाविषयी शासनाने कोणतेही सुधारणाकार्य केले नाही अशी ब्रिटीश सरकारवर ते टिका करतात. 'विधवास्थितीत सुधारणा करणे ही राज्याची नैतिक जबाबदारी आहे. विधवेचा राज्याने पाल्याप्रमाणे पालन करावे व विधवेला दत्तक मुलगी म्हणून घोषित करावे असे मलबारी विधवेच्या दुर्दशेवरील उपाय स्पष्ट करतात.' [व्होरा (२००८) २३१] मलबारींनी इंग्लंडमध्ये 'भारताच्या कन्यांच्यावतीने अर्ज' नावाची पुस्तिका प्रसिद्ध केली. त्यात त्यांनी भारतीय कायद्यातील त्रुटी दर्शविणारी बालपत्नी व बालविधवा यांचा जीवन संघर्ष इंग्रजी वृत्तपत्रातून दाखविला. यांच्याबरोबरच लोकहितवादींनीही विधवेचे दर्शन शतपत्रातून घडवून आणले.

केशवपनसारखी चाल बंद करण्यासाठी कायद्याची मदत घ्यायला हवी अशी आगरकरांची धारणा होती. 'केशवपन करावयाचे न्हाव्यानीच नाकारावे म्हणजे या प्रथेला आपोआप आळा बसेल असे 'दिनबंधू' या सत्यशोधक समाजाच्या मुखपत्राने सुचवताच आगरकरांनी 'अजून तरी सावध व्हा' असा ब्राह्मणांना इशारा दिला व ''दिनबंधूने सुचविल्याप्रमाणे न्हाव्यात जर कट झाला तर किती बरे मजा होईल.'' अशा शब्दात आनंद व्यक्त केला. [फडके (१९७७)५५] इतर सुधारकांप्रमाणे बाळशास्त्री चिपळूणकर 'यांनीही विधवा स्थितीबाबत मते व्यक्त केली. त्यांनी विधवेच्या करूण वेदनादायक स्थितीला विरोध केला. विधवांमुळे अपशकुन होतो या समजावर त्यांनी 'लोकभ्रम' या त्यांच्या निबंधात टिका केली. त्यामध्ये ते 'स्त्रीचे हक्क' ही संज्ञा वापरतात.' [व्होरा

(२००८) २०५] अशाप्रकारे स्त्रियांवरील विधवेचे संकट दूर करण्याचा सुधारकांनी प्रयत्न केला आहे.

पुनर्विवाहाचा प्रश्न

१९ व्या शतकातील एक ज्वलंत प्रश्न म्हणून पुनर्विवाह प्रश्नाकडे पाहिले जाते. बालविवाहामुळे बालविधवेचे संकट निर्माण झाले. बालविधवांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार नव्हता. पुरूष मात्र पत्नी जीवंत असो व नसो अनेक विवाह करीत. विशेषत: ब्राह्मण जातीमध्ये विधवेला पुनर्विवाह करण्यास मनाई होती. १८५६ मध्ये मात्र विधवा पुनर्विवाह कायदा पास झाला. समाजसुधारकांनी या कायद्याचे स्वागत करून पुनर्विवाहही घडवून आणले. 'महर्षि कर्वेनींही ' विधवा पुनर्विवाह परिषदेची' स्थापना केली. आपल्या विचारांप्रमाणे त्यांनी स्वत: आनंदीबाई कर्वे या बालविधवेशी विवाह केला.' [पाटील (२०००) ६०] भारतात इतस्त्रही घातक प्रथांना प्रतिकार करण्यास सुरूवात झाली होती. त्यास न्या. रानडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुशास्त्री पंडीत व डॉ. भांडारकर यांना त्यावेळच्या वृत्तपत्रांनी पाठिंबा दिला. १८५६ साली विधीमंडळात पुनर्विवाहास मान्यता ठराव मंजूर झाला. म. फुले व आगरकरांनीही पुनर्विवाहास पाठिंबा दर्शविला होता.

विधवांची दैन्यावस्था, त्यांचे नैतिक अध:पतन भ्रुणहत्या यातून सुटका करावयाची असेल तर पुनर्विवाह गरजेचा होता. त्यासाठी फुलेंनी शेणवी जातीतील विधवेचा शेवणी विधुराशी पुण्यात १८६० मध्ये पुनर्विवाह घडवून आणला. आगरकरांनी केसरीमधून समाजातील घडामोडींवर व स्त्री प्रश्नावर लेख लिहिले. पुरूषांच्या बहुपत्नीत्वावरही त्यांनी टिका केली. बालविवाह व पुनर्विवाहासारखे प्रश्न सोडविण्याचे कार्य करणाऱ्यांनीच त्या विरोधात वर्तन केल्यास आगरकर त्यांच्या नावानिशी टिकात्मक लेख प्रसिद्ध करीत. आगरकर बालविवाह होवू न देणे व पुनर्विवाहाबाबतीत तरूणांना पुढे येण्यास जागृत करत. आगरकरांप्रमाणे लोकहितवादीनी शतपत्रातून स्त्रीविषयक प्रश्नांना वाचा फोडली. लोकहितवाद्यांच्या मते, 'पुनर्विवाह हिंदू लोकांचे मुळ आहे, व त्यांत निम्मे

सुधारणा आले तर तेणेंकरून फार लाभ आहे.' [टिकेकर (१९४०) ३७६] त्यांनी नाशिकला विधवा पुनर्विवाह मंडळाची स्थापना केली. विष्णुशास्त्री पंडितांनी ' इंदूप्रकाश' मधून विधवा विवाहाचे समर्थन केले.

अशाप्रकारे सुधारकांनी पुनर्विवाहाचे समर्थन केलेले दिसून येते.

स्त्री शिक्षण

स्त्रियांची जी दयनीय अवस्था होती त्यास त्यांचे अज्ञान कारणीभूत होते. स्त्रियांनी शिक्षण घेणे म्हणजे समाजाविरोधी, धर्मविरोधी कृत्य समजले जाई. स्त्रिला शिक्षण दिले तर विश्वासास अपात्र ठरते असा समज होता. मुळातच त्याकाळी स्त्रिला दृष्ट, चंचल, अविचारी मानले जात होते. स्त्रीने जर शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येण्याचा संभव आहे असा समज रूढ होता. [व्होरा (२०००) २४६] स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवून तिला पूजाअर्चा, व्रतवैकल्ये यात गुंतवून ठेवली होती. त्यामार्गे तिचे शोषण केले जात होते. यातून बाहेर काढण्यासाठी तिला शिक्षणाची आवश्यकता होती. त्याशिवाय तिला व्यक्तित्वाची व गमावलेला अधिकार मिळविण्याची जाणीव होणार नव्हती. म. फुल्यांनी १८४८ साली पहिली मुलींची शाळा पुण्यात स्थापन केली. फुलेंनी स्वत:च्या पत्नीस सावित्रीबाईस शिक्षित करून मुलींच्या शाळेत शिकविण्यास तयार केले.

पती मेल्यानंतर पत्नीने सती जाणे किंवा विधवापणीच्या छळास सामोरे जाणे हे स्त्रीचे अज्ञान व परावलंबीत्व असते असे आगरकर म्हणतात. त्यांच्या मते, 'स्त्रियांना स्वचरितार्थ धंद्यांचे ज्ञान द्यावे त्यामुळे नवऱ्याच्या मृत्यूने आपोआप मरणारी किंवा मारून घेणारी स्त्री दिसेनाशी होईल व त्या नवऱ्याच्या नंतर आपल्या मुलाबाळांचे व इतरांचे जीवन सुखावह होण्यासाठी झटू लागतील.' [प्रधान (१९६०) १७५] अशाप्रकारे स्त्रियांवर अपत्यसंगोपनासारखे मोठे जबाबदारीचे काम आहे त्यामुळे आगरकर स्त्रिला स्वचरितार्थ संपादक शिक्षण देण्याची आवश्यकता स्पष्ट करतात व हे शिक्षण इंग्रजीतून देण्यास पाठिंबा देतात. स्त्री शिक्षणास आगरकरांचा पाठिंबा असला तरी ते असे स्पष्ट

करतात की, 'स्त्री–पुरूषांमध्ये जे स्वाभाविक अंतर आहे त्यामुळे काही केलेतरी पुरूषांइतक्या सर्व स्त्रिया कधीच ज्ञानवती होणार नाहीत ते आम्ही प्रांजलपणे कबूल करतो.' [फडके (१९७७) २७] ' विवाहितावस्था व गृहकृत्ये ही स्त्रियांची दोन प्रमुख कर्तव्ये असल्यामुळे स्त्री–पुरूष दोघांना वेगवेगळे शिक्षण दिले जावे अशी केसरीकर्ते स्त्रीशिक्षणाबाबत भूमिका घेतात. ' [फडके (१९८९) ४१]

१९ व्या शतकातील प्रार्थना समाज थिऑसॉफिकल सोसायटी या संस्थांच्या माध्यमातून लोकहितवादींनी स्त्री विषयक कार्यास हातभार लावला. 'महर्षी धोंडो केशव कर्वे यांनाही महाराष्ट्रातील स्त्री शिक्षण प्रसाराचे श्रेय द्यावे लागेल. त्यांनी १८९९ मध्ये अनाथ बालिकाश्रम स्थापन करून सुधारणा कार्याला सुरूवात केली. भारतातील पहिले महिला विद्यापीठ कर्वेंनीच सुरू केले. त्यांनी विधवा स्त्रियांसाठी शाळा, आश्रमाची स्थापना केली. वसतिगृह असणारे महिला महाविद्यालय यांची पुण्यामध्ये निर्मिती केली. स्त्रिया आणि स्त्रिशिक्षणासाठीच कर्व्यांनी आपले जीवन वाहिलेले दिसून येते.' [पाटील (२००२) ६०] यावरून १९ व्या शतकात मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाला सुरूवात झाली.

बहुपत्नीत्व

१९ व्या शतकात बहुपत्नीत्वाची चालही मोठ्या प्रमाणात होती. एक पुरूष अनेक विवाह करीत होता. धर्मग्रंथांचा आधार घेवून दोन–दोन, तीन–तीन बायका करणारे पुरूष स्त्रियांना मात्र बालविधवेचे खडतर जीवन जगायला भाग पाडत असत.

म. फुले, लोकहितवादी, गो.ग. आगरकर व इतर समाजसुधारकांनी बहुपत्नीत्वाला विरोध केला. पुरूषांनी पुन्हा पुन्हा विवाह करावा व स्त्रीने बालवयातच विधवा होवूनही तिला हा अधिकार का नसावा? असा प्रश्न ते शास्त्रकर्त्यांना विचारतात. 'संसारात स्त्री पुरूषांना समान न्याय, समान स्थान असावे नवी बायको करणे व नवा जोडा विकत घेणे ह्या दोन्ही गोष्टी पुरूषांना सारख्याच वाटतात. त्यामुळे पुरूष चार–पाच बायका करतात.

अशी बाळशास्त्री चिपळूणकर कडाडून टिका करतात.' [व्होरा (२०००)२०५] अशाप्रकारे समाजसुधारक बहुपत्नीत्वास विरोध करतात.

जरठ – बाला विवाह

बहुपत्नीत्व, बालविवाह, पुनर्विवाह बंदीसारख्या प्रश्नांइतकी जरठबाला विवाह प्रश्नही १९ व्या शतकात मोठ्या प्रमाणात भेडसावत होता. वृद्ध पुरूष आपल्यापेक्षा खूप लहान वय असणाऱ्या मुलीशी विवाह करत. मुलीचे आईवडील मुलगी लग्नानंतर सुखात राहील व एक पती नसल्याने काहीही होत नाही. पतीनिधनानंतर ती सुखीच राहील यासाठी श्रीमंत वृद्ध मिळाल्यास त्याच्याशी आईवडील लहान वयाच्या मुलीचे लग्न लावून देत. त्यामुळे मुलीला लहान वयातच विधवापणास सामोरे जावे लागे. त्यामुळे या विवाहातून एका निष्पाप कुमारिकेच्या आयुष्याची फरफटच होत होती. या जरठबाला विवाहास समाजसुधारक विरोध करत. यामुळे उद्‌भवणाऱ्या समस्या स्त्रीलाच भोगाव्या लागत. त्यामुळे समाजसुधारकांनी जरठ–बाला विवाहास विरोध केलेला दिसून येतो.

समाजसुधारणेत स्त्रियांचाही सहभाग

पुरूष सुधारकांनी स्त्री–प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले असले तरी त्यांनी समाजातील स्त्री दुय्यमत्वाबद्दल भूमिका मांडली नाही. याला अपवाद फुले व आगरकर होते. कारण इतर समाजसुधारकांच्या तुलनेत समाजातील स्त्रीचे दुय्यमत्व नाकारून त्यांनी स्त्री–पुरूष समानता मान्य केलेली दिसून येते. महात्मा फुलेंनी स्त्री शुद्रावरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी ' ब्राह्मणाचे कसब', ' सार्वजनिक सत्यधर्म' अशी ग्रंथांची रचना केली. मनुष्य जातीला जन्म देणारी, संगोपण, संवर्धन करणारी स्त्री पुरूषापेक्षा नि:संशय श्रेष्ठ आहे. स्त्रियांची दुय्यमत्वाची कारणे त्यांच्या नैसर्गिक शरीरधर्मात नसून पुरूषांच्या कावेबाजपणात आहे असे त्यांचे मत होते. स्त्रियांना मानवी हक्क समजू नये म्हणूनच स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले. स्त्रिया अशिक्षित राहिल्यामुळेच त्यांच्यावर हा जुलमी/अन्यायी प्रसंग आला असे फुले ' सार्वजनिक

सत्यधर्म' मध्ये मांडतात. [मालशे (१९६९) ३७५] कुटुंबात समानता आल्याशिवाय समाजात स्त्री–पुरूष समानता निर्माण होणार नाही हे म. फुलेंनी जाणले होते.

आगरकरांनी समाजातील स्त्रियांचे महत्त्व पटवून देताना त्यांची दुर्दशा थांबवणे महत्त्वाचे असल्याचे कळकळीने समाजापुढे मांडले. त्यांनी स्त्रीही एक माणुसच आहे या मूल्याचा जन्मभर पाठपुरावा केला. 'कोणतीही किंमत देऊन रूढी चालीरिती टिकवल्याच पाहिजेत एवढे त्यांचे महत्त्व नाही. मात्र व्यक्ति त्याच्या स्वातंत्र्याला योग्य ती वाट करून देणे आवश्यक आहे. मानवी संबंधात जुलूम जबरदस्तीचे तत्व नष्ट व्हायला हवे. स्त्री–पुरूष संबंधही याला अपवाद नाही.' [कुलकर्णी (१९९५) १३,१४] अशाप्रकारे अनिष्ठ रूढी प्रथा नष्ट झाल्या पाहिजेत असे आगरकरांचे मत होते. १९ व्या शतकात देशातील या सामाजिक व राजकीय परिवर्तनाच्या लाटेमध्ये स्त्रियाही सहभागी झाल्या. पं. रमाबाई, आनंदीबाई कर्वे, सावित्रीबाई फुले अशा अनेक स्त्रिया यामध्ये सहभागी झाल्या. १८८०–८५ नंतर स्त्रियांचे लेखन सुरू झाले. आणि स्त्रियांच्या लेखनातूनही सामाजिक स्थितीगतीचे चित्र उमटू लागले. यामध्ये सावित्रीबाई फुले, पं. रमाबाई, ताराबाई शिंदे, रखमाबाई राऊत, आनंदीबाई कर्वे, रमाबाई रानडे यांचा समावेश होता. यापैकी विशेषत: पं. रमाबाई यांचे स्त्रीधर्मनीति व ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री–पुरूष तुलना' ही दोन पुस्तके महत्त्वाची होती. १९ व्या शतकातील स्त्री हक्कांची मांडणी करताना या दोन पुस्तकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. यावरून १९ व्या शतकातील स्त्री प्रश्नांकडे सुधारक स्त्रिया कशा रितीने बघत होत्या, पुरूष सुधारकांपेक्षा त्यांचा दृष्टिकोन वेगळा होता का हे ही तपासता येईल.

प्रस्तुत प्रबंधात 'स्त्री–पुरूष तुलना' व 'स्त्रीधर्मनीति' या दोन पुस्तकातील मांडलेल्या स्त्री हक्क प्रश्नांवर चर्चा करण्यात आली आहे. पं. रमाबाई व ताराबाई शिंदे या दोघींच्या जीवन व पुस्तक लिखाणामागील पार्श्वभूमी यांचा अभ्यास करण्यात आला आहे. ताराबाई शिंदे व पं. रमाबाई यांनी समाजास उद्‌बोधनपर उपदेश केला आहे. तरीही या

दोघींच्या विचार दृष्टीकोनात भिन्नता आढळते. त्यामुळे याचाही यामध्ये अभ्यास केला आहे.

१९ व्या शतकात स्त्री ही अज्ञानाच्या व गुलामीच्या अंध:कारात जगत होती. ती गुलामांची गुलाम बनली होती. तिला मन, भावना व अंत:करण असू शकते हे पुरूषप्रधान संस्कृतीने पूर्णपणे नाकारले होते. स्त्रीला केवळ उपभोग्य वस्तू मानले जात होते. हजारो वर्षांपासून तिला मानवी हक्कापासून वंचित ठेवले होते. त्यामुळे त्याही हक्क विसरून गुलामीत धन्यता मानू लागल्या. समाजात स्त्रिला पुरूषांच्या तुलनेत दुय्यम स्थान होते. धर्म, परंपरा, रूढी यामुळे पुरूष श्रेष्ठत्व व स्त्रियांचे गौणत्व यामध्ये १९ व्या शतकात दरी वाढतच गेली. स्त्री–पुरूष विषमता तीव्र होतच गेली. त्यामुळे स्त्रियांच्या वाट्याला त्यातून अत्यंत लैंगिक शोषण व अन्याय, दडपणूक आली. भारतीय स्त्रिला समाजात दलिताहून दलित स्थान होते. तिचे सर्व बाजूंनी शोषण केले जात होते आणि या शोषणातून स्त्रिची सुटका करण्यासाठी समाजसुधारकांनी प्रयत्न केलेले दिसून येतात. पुरूषसुधारकांनी स्त्री प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले असले तरी स्त्रिचे दुय्यमत्व हे स्त्रियांनीच समाजास निदर्शनास आणून दिले. यामध्ये विशेषत: ताराबाई शिंदे व पं. रमाबाईंचे नाव घेता येईल. म्हणूनच ताराबाईंच्या 'स्त्री–पुरूष तुलना' व रमाबाईंच्या ' स्त्रीधर्मनीति' चा अभ्यास केला आहे.

१९ व्या शतकातील स्त्रीप्रश्न, स्त्री–पुरूष तुलना व स्त्रीधर्मनीति यांच्या विशेष संदर्भात झालेले संशोधन

१९ व्या शतकातील स्त्रीप्रश्नासंबंधित बरेच संशोधन झालेले दिसून येते. परंतु ताराबाई शिंदे व पं. रमाबाई यांनी मांडलेल्या स्त्रीप्रश्नांवर संशोधन कमी प्रमाणात झालेले आहे ते पुढील प्रमाणे –

१) जोगळेकर मृणालिनी : स्त्री अस्मितेचा अविष्कार : १९ वे शतक भाग – १

पं. रमाबाई –

मृणालिनी जोगळेकर यांनी स्त्रीअस्मितेचा अविष्कार १९ वे शतक या पुस्तक मालिकेत १९ व्या शतकातील चौकटीबाहेरचे जीवन जगलेल्या स्त्रियांच्या जीवनाचा वेध घेतला आहे. या मालिकेत भाग १ या पुस्तकात त्यांनी पं. रमाबाईंच्या जीवनाचा वेध घेतला आहे. यात लेखिकेने रमाबाईंच्या जन्मापासूनच्या घटनांचा मागोवा घेतला असून संपूर्ण जीवन प्रवासाचे चित्रण केलेले आहे. पं. रमाबाईंनी लिहिलेल्या सर्व पुस्तकांचाही आढावा घेतला आहे. या पुस्तकात लेखिकेने रमाबाईंच्या जीवन, कर्तृत्व, संस्थात्मक कार्य, लेखन कर्तृत्व याविषयी सविस्तर विवेचन केले आहे. जोगळेकरांनी पं. रमाबाईंच्या सर्व पुस्तक लिखाणातील भूमिका स्पष्ट करून त्यांचा जीवनसंघर्ष स्पष्ट केला आहे. स्त्रीउद्धारकर्ती रमाबाई यांच्या भूमिकेमागील धाडसी साहसी व्यक्तिमत्व दर्शविले आहे.

२) जोगळेकर मृणालिनी : स्त्री अस्मितेचा अविष्कार : १९ वे शतक भाग –३

ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे –

या पुस्तकात जोगळेकरांनी प्रकाशाआड राहिलेल्या ब्राह्मणेत्तर ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे यांच्या जीवनाचा वेध घेतला आहे. त्यामध्ये जोगळेकर यांनी ताराबाईच्या विचारसरणीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याप्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्व, कर्तृत्व व भूमिका स्पष्ट दर्शविली आहे. १९ व्या शतकातील स्त्री–पुरूष नातेसंबंध उलघडून दाखविणाऱ्या ताराबाईंच्या भूमिकेचे वेगळेपण जोगळेकर यांनी दर्शविले आहे. लेखिकेने या पुस्तकात ताराबाईंच्या प्रत्येक संवादामागील ताराबाईंची भूमिका स्पष्ट केलेली आहे. ताराबाईंच्या 'स्त्री–पुरूष तुलना' लेखनाच्या आधारे स्त्रीविषयक भूमिका, स्त्री जीवनाच्या संदर्भात कर्तृत्व व वेगळेपण लेखिकेने येथे सविस्तरपणे स्पष्ट केले आहे.

३) उमा चक्रवर्ती : Rewriting History the life & times of Pandita Ramabai

उमा चक्रवर्तीचे Rewriting History the life & times of Pandita

Ramabai ह्या पुस्तकात पं. रमाबाईंचे जीवन आणि कार्य यांच्या पार्श्वभूमीवर १९ व्या शतकातील महाराष्ट्रात पुरूषसत्तेची पुनर्रचना कशी झाली याचे विवेचन करण्यात आले आहे. पुरूष सत्तेने ज्या नवीन संस्थात्मक संरचना निर्माण केल्या, जातीव्यवस्थेकडे बघण्याचा एक नवीन दृष्टिकोन दिला, नवी वर्गीय रचना अस्तित्वात आणली या त्यातून राष्ट्रवाद उदयाला आला या सर्वांमुळे स्त्री–पुरूष संबंधामध्ये अमुलाग्र बदल घडून आले याचे विश्लेषण करताना उमा चक्रवर्ती यांनी असे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे की, १९ व्या शतकात स्त्रियांपुढे नवनवीन आव्हाने उभी राहिली. स्त्री–पुरूष संबंधाकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन प्राप्त झाला. त्यांच्यामते, १९ व्या शतकात महाराष्ट्रात पुरूषसत्ता व्यवस्थेवर टिका करणाऱ्या काही विदुषी उदयाला आल्या. यामध्ये पं. रमाबाई या महत्त्वाच्या क्रांतीकारी स्त्री होत्या.

४) संपादक : विलास खोले : स्त्री पुरुष तुलना

खोले विलास यांनी यात ताराबाईंच्या 'स्त्री–पुरूष तुलना' या पुस्तकाचा सविस्तर आढावा घेतला आहे. यांनी प्रस्तावनेत प्रदीर्घ मौनानंतर उमटलेला स्वर असे ताराबाईंचे वर्णन केलेले आहे. प्रस्तावनेत स्त्रियांच्या लेखनाची परंपरा, स्त्री विवाहित आणि विधवा, विवाहाच्या चार तऱ्हा, पुरूषांच्या दुर्गणांची मीमांसा, विजयालक्ष्मीचा खटला, मुलभूत प्रश्नांची मांडणी, ताराबाई शिंदेंचे व्यक्तिमत्व, ताराबाईंच्या पुस्तकास मिळालेल्या प्रतिसादाच्या अभावामागील कारणे अशा विविध मुद्यांद्वारे संपादकाने 'स्त्री–पुरूष तुलना' पुस्तकाची वैशिष्ट्ये विशद केली आहेत. ताराबाईंची व म. फुले व पं. रमाबाईंशीही तुलना केलेली आहे. व विशेषत: त्यांनी 'स्त्रीधर्मनीती' व 'स्त्री–पुरूष तुलना' या ग्रंथाची तुलना केलेली आहे, पण मर्यादित स्वरूपात. त्यांनी हा एक वेगळा विषय यामध्ये मांडलेला आहे. 'स्त्री–पुरूष तुलना' लिखाणामागील प्रमुख कारण 'विजयालक्ष्मीचा खटला' प्रकरणाची बातमी व निकालपत्र यामध्ये उपलब्ध केले आहे. त्याचबरोबर स्त्री–पुरूष तुलनेची मूळ संहिताही दिलेली आहे.

५) संपादक मालशे सं.ग : स्त्री –पुरूष तुलना –

मालशेंनी यामध्ये ताराबाई शिंदेंच्या 'स्त्री–पुरूष तुलने' ची मूळ संहिता देवून ताराबाईंनी यात घेतलेल्या स्त्रीवादी भूमिकेतील परखडपणा, त्यांची व्याप्ती, व्यक्तिविशेष, लिखाणाची भाषा याविषयांचा समावेश केला आहे. मालशेंनी प्रस्तावनेत ताराबाईंचे व्यक्तिचित्रण, पुस्तकात घेतलेली भूमिका, भाषा विशेष स्पष्ट दाखवून दिलेले आहे. तसेच पुरूषी सत्तेला ताराबाईंनी केलेले सवाल मालशेंनी स्पष्ट करून ताराबाईंच्या काळातील स्त्रिया व ताराबाई यातील फरक मालशेंनी दाखविला आहे.

या संशोधनामध्ये राहिलेली पोकळी

१९ व्या शतकात अनेक समाजसुधारकांनी स्त्री प्रश्न हाताळला आणि त्याचे संहितीकरणही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. या सुधारकांमध्ये ज्या दोन क्रांतीकारी स्त्रियांनी आपले योगदान दिले त्यांच्यावर मात्र अत्यंत मर्यादित संशोधन उपलब्ध आहे. त्याचा वर निर्देश करण्यात आला आहे. परंतु या संशोधनाने पं. रमाबाई आणि ताराबाई शिंदे यांचा जीवनपट उलघडून दाखविला आहे किंवा त्यांच्या एकूणच विचारांचा आढावा घेण्यात आला आहे. मालशे आणि खोले या दोघांनी ताराबाई शिंदेंच्या पुस्तकाच्या निमित्ताने ताराबाईंचा जीवनपट आणि स्त्री–पुरूष तुलनेमधील विचार विश्लेषित करण्याचा प्रयत्न केला आहे.

परंतु समकालीन असणाऱ्या ताराबाई आणि रमाबाई यांनी ६ महिन्याच्या अंतराने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांचा तौलनिक अभ्यास मात्र उपलब्ध नाही. सदर संशोधनामध्ये 'स्त्री–पुरूष तुलना' आणि 'स्त्रीधर्मनीति' या दोन पुस्तकांचा तुलनात्मक अभ्यास करून दोघींच्या विचारातून साम्यस्थळे कोणती, त्यांच्यातील भेद कोणता याचा अभ्यास तर शक्य होणारच आहे. शिवाय हे दोनही ग्रंथ भारतातील स्त्रिवादाचे स्त्रियांनी लिहिलेले पहिले ग्रंथ आहेत. म्हणूनही त्यांचा चिकित्सक आणि तौलनिक अभ्यास गरजेचा आहे. तत्कालिन पुरूष समाजसुधारकांनी ज्या स्त्रीप्रश्नांना अग्रक्रम दिला त्यांच्या तुलनेत

ताराबाई आणि रमाबाई या स्त्री समाजसुधारकांनी स्त्रीप्रश्नाची मांडणी वेगळ्या पद्धतीने केली का, त्यांचा स्त्रीप्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा होता या संबंधीचे संशोधन उपलब्ध नाही. सदर संशोधनामुळे ही पोकळी भरून निघणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१) १८८२ साली प्रसिद्ध झालेल्या 'स्त्री–पुरूष तुलना' या पुस्तकाने विशद केलेला स्त्रीप्रश्न अभ्यासणे.

२) १८८२ साली प्रकाशित झालेल्या स्त्रीधर्मनीति पुस्तकात पं. रमाबाईंनी विशद केलेल्या स्त्रीप्रश्नाचा अभ्यास करणे.

३) ६ महिन्याच्या अंतराने प्रसिद्ध झालेल्या या दोन्ही पुस्तकांच्या लेखिकेंचा जीवनपरिचय समजून घेवून त्यांच्या जडणघडणीतील, विचारातील साम्यभेद समजून घेणे.

४) 'स्त्री–पुरूष तुलना' आणि 'स्त्रीधर्मनीति' या दोन पुस्तकांमध्ये मांडलेल्या स्त्रीप्रश्नांचा तौलनिक अभ्यास करणे.

५) १९ व्या शतकात समाजसुधारणेच्या चळवळीत अनेक पुरूष अग्रभागी होते आणि त्यांनी स्त्रीप्रश्नाला अग्रक्रम दिला. त्यांचा स्त्रीप्रश्नांकडे बघण्याचा दृष्टिकोन ताराबाई आणि रमाबाई या दोन स्त्रियांचा स्त्रीप्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन यामध्ये काय वेगळेपण आहे हे तपासणे.

६) ताराबाई शिंदे आणि पंडिता रमाबाई यांचे स्त्रीप्रश्नांसंबंधीचे विचार सद्य:कालीन स्त्रीवादाच्या संदर्भात किती सुसंगत आहे हे तपासणे.

संशोधन पद्धती

"१९ व्या शतकातील स्त्री हक्कांची मांडणी : 'स्त्री–पुरूष तुलना' व 'स्त्रीधर्मनीति' यांच्या विशेष संदर्भात" या विषयाचा अभ्यास करताना ऐतिहासिक

संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून त्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

१) प्राथमिक साधने

यामध्ये 'स्त्री–पुरूष तुलना' व 'स्त्रीधर्मनीति' या प्रमुख दोन पुस्तकांचा आधार घेतला गेला.

२) दुय्यम साधने

प्रस्तुत शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला त्यामध्ये अनेक विचारवंतांनी लिहिलेले ग्रंथ, पुस्तिका, त्याचबरोबर विविध लेखांचा आधार घेतला गेला.

प्रकरण योजना

१) प्रस्तावना

२) 'स्त्री–पुरूष तुलने'ची मूलगामी मांडणी

३) 'स्त्रीधर्मनीति' मधील पं. रमाबाई यांची भूमिका

४) ताराबाई शिंदे आणि पं. रमाबाई यांच्या स्त्री हक्कासंबंधी दृष्टिकोनाचा तौलनिक अभ्यास.

५) निष्कर्ष

संदर्भसूची

१. कर्वे स्वाती, (२००३), 'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा (१८५०-१९५० मधील स्त्रियांच्या निवडक लेखांचा संग्रह)' , प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती.

२. कुलकर्णी प्रसाद, (१९९५), 'सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकर' , प्रबोधन प्रकाशन समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी.

३. टिकेकर श्री. रा.,(१९४०), ' लोकहितवादींची शतपत्रे', उषा प्रकाशन, औन्ध.

४. पाटील भारती , (२००७), 'महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळीचा मागोवा', प्रबोधन प्रकाशन ज्योती, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी.

५. पाटील शोभा , (२००२), 'स्त्रियांची आत्मचरित्रे : स्त्रिवादी शोध', मल्हार प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती.

६. प्रधान ग. प्र., (१९६०), ' आगरकर लेखसंग्रह' , साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती.

७. फडके य. दि., (१९७७), 'शोध बाळ गोपाळांचा' , श्री. विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती.

८. फडके य. दि., (१९८९), '२० व्या शतकातील महाराष्ट्र खंड-१ बाळ' , श्री. विद्या प्रकाशन, पुणे,

९. भागवत विद्युत, (२००४), ' स्त्रीप्रश्नांची वाटचाल' , प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती.

१०. मालशे, कीर धनंजय, (१९६९), 'महात्मा फुले : समग्र वाङ्.मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

११. रानडे प्रतिभा, (२००५), 'स्त्रीप्रश्नांची चर्चा १९ वे शतक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१२. व्होरा राजेंद्र, (२०००) 'आधुनिकता आणि परंपरा' , प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती.

१३. सहस्त्रबुद्धे पु.ग., (१९७४), 'केसरीची त्रीमुर्ती', केसरी प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती.

१४. संत दु. का., (२००३), 'मराठी स्त्री', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती.